

# ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आण्णा बाबुराव देवर्षी


समडोळी गावात ज्या व्यक्तिचा मोठा अभिमान आहे ती व्यक्ती म्हणजे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आण्णा बाबुराव देवर्षी होय. १९५२ च्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी वसंतदादा पाटील यांच्या विरोधात सांगली विधानसभा लढवून संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली होती.

आण्णासाहेब देवर्षी यांचा जन्म १९२२ मध्ये झाला. सांगलीच्या सीटी हायस्कूलमध्ये शिकत असताना एक दिवस टिळक स्मारक मंदिरमध्ये ज्येष्ठ काँग्रेस नेते पोपटलाल शहा यांचे भाषण ऐकून त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. २६ जानेवारी १९३९ रोजी त्यांनी राष्ट्र सेवा दलाचे सदस्यत्व स्वीकारले. घरच्यांचा पूर्ण विरोध असतानाही त्यांनी कशाचीही पर्वा न करता स्वातंत्र्यसंग्रामात स्वतला झोकून दिले. १९४२ मध्ये एस. एम. जोशी यांनी आण्णा देवर्षींना पुण्यात शिबिरात बोलावून घेतले व राष्ट्र सेवा दलात पूर्ण वेळ काम करण्यास सांगितले. दीड महिन्याचे शिबीर पूर्ण झाल्यानंतर आण्णांनी पूर्ण वेळ राष्ट्र सेवा दलासाठी वाहून घेतले. राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला. राष्ट्र सेवा दलाचे ते सांगली जिल्हा प्रमख झाले. कोल्हापूरमध्ये बॉम्ब तयार करणारा एकजण जखमी झाला. त्यावेळी त्याला समडोळीत आणून त्यांच्यावर उपचार करून त्याला परत पुण्याला गुपचूप पाठविण्यास आण्णा सर्वात पुढे होते. त्यांनंतर आण्णांवर पोलीसांनी लक्ष ठेवले. त्या दरम्यान दोन महिने आण्णांना कारावासही भोगावा लागला.


वसंतदादांनी ज्यावेळी सांगलीचा तुरूंग फोडला त्यावेळी त्यांच्या बरोबर कारंदवाडीचे जिनपाल खोतही होते. जिनपाल खोत यांनी दोन दिवस समडोळीत आण्णा देवर्षी याच्या घरात लपून बसले होते. आण्णा देवर्षी यांनी जरी वसंतदादांच्या विरोधात विधानसभा लढवली असली तरी त्यांच्याच भांडन नव्हते. केवळ वैचारिक मतभेद होते. वसंतदादा कित्येक वेळा समडोळीला येवून आण्णांच्या तब्येतीची विचारपूस करीत असत.

वसंतदादांबरोबर कायमच त्यांची जवळीक होती. त्यांनी विकास कामात कधी राजकारण आणले नाही. समडोळीच्या हायस्कूलच्या कामासाठी त्यांनी मुंबईला जावून वसंतदादांकडून पाच हजार रूपये आणले होते. वसंतदादांनी आण्णांना सांगली बाजार समितीच्या अध्यक्षपदी काम करण्याची संधीही दिली होती. समडोळी शिक्षण संस्था, उदय इरिगेशन स्कीम आदी संस्था उभारणीतही त्यांचा मोठा वाटा होता. समडोळी विकास सोसायटीचे ते ३५ वर्षे अध्यक्ष होते.


पहिले व्यापारी दादा अण्णा पाटील


ज्येष्ठ लेखक ना. ह. आपटे


महाराजांबरोबर गिरनार यात्रा केलेले भुजगोंडा चिट्टे०


वीरानुयागी आ. भा. मगदुम


पहिले सरपंच अण्णासाहेब पाटील


विक्रमी १६ वर्षे सरपंच जि. सु. पाटील


समडोळी शिक्षण संस्थेचे संस्थापक शांतगोंडा पाटील

# समडोळीच्या मातीतील महनीय व्यक्ती

**दीडदोनशे वर्षाच्या समडोळीच्या इतिहासात अनेक महनीय व्यक्ति होवून गेल्या. अगदी व्यापारी, लेखक, राजकारणी, धार्मिक लोक यांचा समावेश होता.**

### पहिले व्यापारी दादा पाटील

समडोळीच्या इतिहासात पहिले व्यापारी म्हणून दादा पाटील यांचे नाव घयावे लागेल. गाव स्थापन होत असतानाच त्यांनी लाकूड, माती,दगडांचा व्यापार सुरू केला होता. त्यानंतर त्यांनी सांगलीत जावून व्यापार सुरू केला. रत्नाकर बँकेचे अधयक्ष बाबगोंडा पाटील यांचे ते वडील.

### लेखक ना. ह. आपटे

समडोळीच्या इतिहासात ना. ह.आपटे यांचे नाव घयावे लागेल. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. भारताचे माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी त्यांचया अनेक पुस्तकांचे अनेक भाषांमधये अनुवाद केला आहे.

### भुजगोंडा चिट्टे

अत्यंत धार्मिक वृत्तीचे असलेले भुजगोंडा चिट्टे हे कायम शांतीसागर महाराजांच्या समवेत असायचे. सम्मेद शिखरजी आणि गिरणार यात्रा त्यांनी महाराजांसोबत केली होती. यात्रेदरम्यान त्यांनी महाराजांना खांद्यावर घेवून त्यांनी काही वेळ प्रवास केला होता. महावी जिनमंदिर बांधकामातही त्यांचे मोठे योगदान आहे.

### वीरानुयागी आ. भा. मगदूम

लेखक ना. ह. आपटे यांच्या नंतर लेखकाचा वारसा आ. भा. मगदूम यांनी पुढे चालू ठेवला. अनेक जैन पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांना वीरानुयागी हा किताब देणयात आला होता.

### पहिले सरपंच बापूसाहेब पाटील

समडोळी ग्रामपंचायतीची स्थापना झाल्यानंतर पहिले सरपंच होणयाचा मान आणणासाहेबा उर्फ बापुसाहेब पाटील यांना मिळाला. १९४० ते १९५३ सलग तेरा वर्षे ते सरपंच होते. महावीर जिनमंदिरमधेही त्यांनी अनेक वर्षे अधयक्ष होते.


### विक्रमी १६ वर्षे सरपंच जि. सु. पाटील

समडोळीच्या इतिहासात विक्रमी जास्त काळ सरपंचपदावर राहणयाचा मान जिनगोंडा उर्फ जि. सु. पाटील यांना मिळाला. १९५७ ते १९६२ आणि परत १९६७ ते १९७८ असे १६ वर्षे त्यांनी समडोळी गावचया सरपंचपदाची धुरा सांभाळली. काही काळ ते वसंतदादा कारखान्याचे उपाधयक्षही होते.

### समडोळी शिक्षण संस्थेचे संस्थापक शांतगोंडा पाटील

समडोळीत शिक्षणाचे महत्व ओळखून शांतगोंडा नरसगोंडा पाटील शालिनी पाटील यांनी समडोळी शिक्षण संस्थेची स्थापना केली. पहिले चेअरमनही तेच होते. कोल्हापूरमधयेही त्यांचो शालिनी स्टोअर्स या नावाने कपड्याचा व्यापार होता. असे अनेक ज्ञात, अज्ञात लोकांमुळे समडोळीचे नाव आज जगभर गाजत आहेत. गावातील अनेक लोक आज जगाच्या कानाकोपऱ्यात शिक्षण, व्यापार, नोकरीच्या निमित्ताने स्थायिक झाले आहेत.

# रत्नाकर बँकेचे संस्थापक बाबगोंडा पाटील



समडोळीच्या इतिहासात जी थोर माणसे होऊन गेली, त्यामध्ये बाबगोंडा भुजगोंडा पाटील, राजमती आक्का, एन. डी. पाटील यांचा नंबर बराच वरचा आहे. समडोळीतील पहिले व्यापारी दादा अण्णा पाटील यांच्यां तीन मुलांपैकी बाबगोंडा पाटील, सुरगोंडा व नेमगोंडा पाटील. राजमतीआक्का या नेमगोंडा पाटील यांच्या पत्नी. बाबगोंडा पाटील यांनी रत्नाकर बँकेची स्थापना करून सम डोळीचे नाव सर्वत्र गाजविले तर नेम गोंडा पाटील व राजमतीआक्का यांनी सांगलीमध्ये येऊन आपली संस्कृती व बुद्धीच्या जोरावर सर्वांना आपलेसे केले.

बाबगोंडा यांचा जन्म १२ डिसेंबर १८८८ रोजी झाला. पुढे ते दत्तक गेल्याने वडिलांचे नाव भुजगोंडा हे लागले. त्यांचे प्राथमिक शिक्षण समडोळीतच झाले. सन १९०० मधील स्कॉलरशिपची परीक्षा झाली त्यात ते पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. माध्यमिक शिक्षण कोल्हापर व सांगली येथे झाले. मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून ते बी. ए. झाले.


साताराचे कर्मवीर भाऊराव पाटील. हे त्यांचे कोल्हापूर येथील बोर्डिंगमधील सहाध्यायी होते. १९२२ ते १९४६ पर्यंत द. भारत जैन सभेची धूरा त्यांनी सक्रीय स्वरूपात वाहिली. तसेच सांगली संस्थानमध्ये रयत असेंब्ली स्थापन झाली. त्यावेळी यांची प्रथम अर्थमंत्री व नंतर विकासमंत्री म्हणून नेमणूक झाली. कृष्णा वेअरचे काम व वज्रचौडे बांधकामाची कल्पना त्यांचीच.

औद्योगिक क्षेत्रात व आर्थिक क्षेत्रातही त्यांची दृष्टी चौफेर होती. रत्नाकर इंडस्ट्रीज लि. कोल्हापूर, दि. महाराष्ट्र मेटल अँड जनरल वर्क्स लि. सांगली यासारखे कारखाने काढून औद्योगिक समडोळीतच विकास करण्याची मुहुर्तमेढ त्यांनीच रोवली. १९४३ साली रत्नाकर बँकेची सुरूवात त्यांनीच केली. बँकेचे पहिले अध्यक्षही तेच होते. सुरूवातीचे १३ वर्षे ते या बँकेचे अध्यक्ष होते.

स्व. राजमतीआक्का पाटील यांचा जन्म १७ मे १९१४ रोजी झाला. ज्या काळात मुलेसुद्धा क्वचित शाळेत जात, त्या मुलांच्या शाळेत कै. भाऊ रायगोंडा पाटील किणीकर यांच्या हायस्कूलात इंग्रजी शिकणार्या मुलीमुळे शिक्षणाच्या ध्येयाने प्रेरित होऊन दाखल झाली व आपल्या प्रगतीने सर्वांना आनंद देऊ लागली. सातारा केंद्रात व्हार्नाक्युलर परीक्षेत पहिला क्रमांक मिळविलेल्या राजाक्काचे बक्षिस त्यांना घरी आणून देण्यात आले.

राजमतीआक्का या नेमगोंडा पाटील यांच्या भाचीच होत्या. त्यांचा बालपणीचा बराच काळ समडोळीतीच गेला. पुढे पाटील यांच्याशी विवाह झाल्यानंतर दहाव्याच दिवशी राजमतीआक्का पुण्याच्या महिला ट्रेनिंगमध्ये कडक शिस्तीच्या पारशी प्राचार्या मिस वाडिया यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाचे आदर्श पाठ घेण्यासाठी दाखल झाल्या. पुढील तीन वर्षाच्या शिक्षण काळात प्रथम क्रमांक मिळविलेल्या राजमती आक्कांचे सर्वत्र अभिनंदन झाले.

अक्कांनी आपल्या पतीच्या हयातीतच आपल्या खात्यावरचे २५ हजार रूपये मिळालेली लॉ कॉलेजची परवानगी हातची जाऊ नये म्हणून देऊन टाकली. सेवानिवृत्तीनंतर जैन महिलाश्रम, हिंदमाता कंझ्युमर्सचे ऑनररी सेक्रेटरीपद त्यांनी भूषविले.



प्रथमाचार्य १०८
प. पू. शांतीसागरजी
महाराज
यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त
येणाऱ्या सर्व श्रावक श्राविकांचे
हार्दिक स्वागत.!


प्रणव इंडस्ट्रीज्

शाळेसाठी लागणारे बँचेस,
स्टील फर्निचर, ग्रील गेट, शटर,
फोल्डींग गेट आदिंसह फॅब्रीकेशन
तसेच स्टेनलेस स्टीलची कामे
करुन मिळतील.

४९६/१, हेर्लेकर प्लॉट नं.४, बजाज
अ‍ॅग्रो विठ्ठलनगर शेजारी, कोल्हापूर
रोड, सांगली- ४१६४१६

राजेश देवर्षी
९९६०२०७१६४, ८८५६८२७२७१

रोहन
८६२४८६८६६०


प्रथमाचार्य १०८
प. पू. शांतीसागरजी
महाराज
यांच्या ६९ व्या
पुण्यतिथीनिमित्त येणाऱ्या
सर्व श्रावक श्राविकांचे
हार्दिक स्वागत.!

राजेंद्र पाटील : 9423002571
जयश्री पाटील : 7304071008

agriculture
is our culture

मे.पद्मावती कृषी सेवा केंद्र

Dealers in : Agricultural Pesticides, Seeds & Fertilisers


गाळा नं. २ आशिर्वाद बिल्डींग, डॉ. उदगांवकर हॉस्पिटल समोर, एस. टी. स्टँन्ड रोड, सांगली. ४१६ ४१६
ऑफीस : ०२३३३-२३२८५०२ E-mail : rajendrapatil7171@gmail.com

* अधिकृत विक्रेते *

- धानूका अ‍ॅग्रीटेक लि.
- यु. पी. एल. लि.
- क्रिस्टल क्रॉपसायन्सेस लि.
- कोरोमंडल इंटरनॅशनल लि.
- हायफिल्ड अे. जी. केम लि.,
- झायडेक्स् बायटेक लि.
- इनसेक्टीसाईडस् इंडिया लि.
- सुमिटोमो केमिकल्स् लि.
- घरडा केमिकल्स
- टी. स्टेन्स अ‍ॅण्ड कंपनी लि.
- जयशिल सल्फर इंडिस्ट्रज
- अ‍ॅडव्हान्स पेस्टीसाईड लि.
- आदामा इंडिया प्रा. लि.
- अतूल लिमिटेड
- झायटेक्स बायोटेक प्रा. लि.,
- धनश्री क्रॉप सोल्युसन्स (कॉम्पो)
- आनंदा अ‍ॅग्रो केअर
- पारिजात केमिकल्स् लि.
- पी. आय. इंडस्ट्रीज लि.
- विलोवूड क्रॉप सायन्सेस प्रा. लि.
- नागार्जुना अ‍ॅग्रीकेम लि.,
- न्युट्रीमॅक्स अ‍ॅग्रो
- मॅनकाइन्ड अ‍ॅग्रीटेक लि.
- ग्रीन व्हिजन बायटेक लि.


मा. राजेंद्र पाटील


सौ. सुजाता पाटील





मा. सुनील पाटील

प्रथमाचार्य १०८
प. पू. शांतीसागरजी
महाराज
यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त
येणाऱ्या सर्व श्रावक श्राविकांचे
हार्दिक स्वागत.!

सौ. सुजाता पाटील
ग्रा. पं. सदस्या,
समडोळी

सुनील पाटील
संचालक, शांतीसागर को. ऑप.
क्रे. सोसायटी, समडोळी



मा. पृथ्वीराज भैय्या
पवार




मा. महावीर चव्हाण
माजी सरपंच, समडोळी

प्रथमाचार्य १०८
प. पू. शांतीसागरजी
महाराज
यांच्या ६९ व्या
पुण्यतिथीनिमित्त
येणाऱ्या सर्व श्रावक श्राविकांचे
हार्दिक स्वागत.!

नवसुवर्ण तरुण मंडळ, समडोळी




मा. बी. बी.
बुदनाळे

प्रथमाचार्य १०८
प. पू. शांतीसागरजी महाराज
यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त येणाऱ्या
सर्व श्रावक श्राविकांचे
हार्दिक स्वागत.!

बी. बी. बुदनाळे फाउंडेशन, मिरज
पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्षारोपण



Symbol of Trust

कर्मवीर भाऊराव पाटील
नागरी सहकारी पतसंस्था मर्या; सांगली.
KBP

प्रधान कार्यालय-कोल्हापूर रोड,सांगली • फोन नं. : ०२३३-२३२३९२६
कर्मवीर पतसंस्थेच्या मदतीने, चला आपले जग बदलूया...

सभासदांना आधुनिक बँकींग व तत्पर सेवा देणारी
सभासदांच्या विश्वासाची,गतिमान अर्थसंस्था...

कर्मवीर पतसंस्था...

सांपत्तिक स्थिती :

| | |
|---|---|
| भागभांडवल | ३४ कोटी ८५ लाख |
| स्वनिधी | १०६ कोटी २९ लाख |
| गुंतवणूक | ३७२ कोटी ७२ लाख |
| ठेवी | १०९० कोटी ६९ लाख |
| कज | ८११ कोटी १४ लाख |
| खेळते भांडवल | १२८७ कोटी ७३ लाख |
| शाखा | ६२ |
| सभासद | ६४००० |
| नफा | २६ कोटी ०१ लाख |

खास वैशिष्टयै:

- व्यवसाय २००० कोटीपेक्षा अधिक
- ठेवी ११०० कोटीकडे वाटचाल...
- ३७ वर्षाची अविरत यशस्वी सेवा
- ६२ शाखांतून आधुनिक सेवा
- ISO मानांकन प्राप्त संस्था
- ऑनलाईन कोअर बँकींग सेवा
- मोबाईलवर बँकींग सुविधा
- संस्थेचा IFSC code -ICIC0000104
- SMS BANKING /NEFT/RTGS/D.D.सुविधा
- QR Code पेमेंट ची सुविधा
- प्रत्येक व्यवहाराची माहिती एसएमएसद्वारे मिळण्याची सुविधा.
- लॉकर सुविधा उपलब्ध
- सतत ऑडिट वर्ग-अ
- सर्व शाखा CCTV व अलार्म सुरक्षेने सज्ज

IMPS सुविधा (मोबाईलद्वारे 24x 7-365 दिवस पैसे ट्रान्सफर करण्याची जलद सुविधा)



मा.श्री.अनिल श्रीपाल मगदूम
मुख्य कार्यकारी अधिकारी

मा.डॉ.अशोक आण्णा सकळे
व्हा.चेअरमन

मा.श्री.रावसाहेब जिनगोंडा पाटील
चेअरमन

मा.अ‍ॅड.एस.पी.मगदूम
संचालक

मा.डॉ.रमेश वसंतराव ढबू
संचालक

मा.श्री. अे.के.चौगुले(नाना)
संचालक

मा.श्री. वसंतराव धुळाप्पाण्णा नवले
संचालक

मा.डॉ. एस.बी.पाटील (मोटके)
संचालक

मा.डॉ.चेतन आप्पासाहेब पाटील
संचालक

मा.श्रीमती भारती आप्पासाहेब चोपडे
संचालिका

मा.सौ.चंदन नरेंद्र केटकाळे
संचालिका

मा.श्री.आप्पासो दादू गवळी
संचालक

मा.श्री. बजरंग भाऊसो माळी
संचालक

मा.श्री.अमोल विनायक रोकडे
संचालक

मा.डॉ.नरेंद्र आनंदा खाडे
तज्ञ संचालक

मा.श्री.लालासो भाऊसो थोटे
तज्ञ संचालक


मा. वैभव (दादा) पाटील

प्रथमाचार्य १०८ प. पू. शांतीसागरजी महाराज
यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त येणाऱ्या सर्व श्रावक श्राविकांचे
हार्दिक स्वागत.!



मा. किरण पाटील
उपाध्यक्ष, चातुर्मास कमिटी

मा. महाबल मुंडे
माजी चेअरमन सोसायटी

श्री. अभय पाटील-ढंग
माजी ग्रामपंचाय सदस्य,
समडोळी

मा. प्रमोद ढोले
माजी उपसरपंच,
समडोळी

शुभेच्छुक
न्यू विजय कला, क्रीडा व व्यायाम मंडळ
समडोळी, ता. मिरज. जि. सांगली.